# सलणारा सल - भाग २

"सर, युवर फूड इज गेटिंग कोल्ड. कॅन आय मेक इट वॉर्म फॉर यू?" ती माझ्या टेबलपाशी येऊन विचारत होती.

मी भानावर आलो.

पुढ्यातलं ऑम्लेट-ब्रेड ए.सी.मुळं थंडगार झालं होतं. मी तिला ते गरम करून दे म्हटलं. तिनं त्याप्रमाणे ते गरम करून टेबलवर आणून ठेवलं.

हॉटेलमधली वर्दळ आता कमी झाली होती.

"सर, युवर फेवरिट हॉटचॉकलेट ..." माझं खाणं संपताच माझ्या ऑर्डरप्रमाणे तिने ते आणून माझ्या टेबलवर ठेवलं. मी हसून तिच्याकडं पाहिलं.

ती जरा माझ्या टेबलापाशी घुटमळली.

वीस-बावीस वय असेल तिचं. तिचे डोळे खूपच बोलके होते.

मी प्रथमच तिच्या चेहऱ्याकडे न्याहाळून पहात होतो. माझ्या मनांत विचार आला, हिला काही बोलायचं आहे का माझ्याशी?

तेवढ्यात ती म्हणालीच, "सर, आय वॉन्ट टू टॉक टू यू. इफ यु डोन्ट माईंड ... कॅन आय सिट हियर?"

गेले सहा महिने ती या हॉटेलमध्ये काम करतेय हे मी पाहिलं होतं. एक रविवार सोडून बाकी दररोजच मी इथं संध्याकाळी उशीरा ठराविक वेळेला येत होतो.

काय बोलायचं असेल हिला? मी इथं नियमित येतो हे माहीत असल्यामुळं कदाचित पैशाची मदत किंवा जॉब वगैरे हवा म्हणून विचारायचं असेल ...

पण ती इथे माझ्या टेबलपाशी बसली तर ह्या हॉटेलच्या मालकाला चालेल का? इथे ती वेट्रेसचा जॉब करते आहे. बरं, ही मुलगी चेहऱ्यावरून तरी 'तशी' म्हणजे कॉलगर्ल वाटत नाहीये. हे हॉटेलसुद्धा फॅमिली रेस्टॉरंट आहे.

मग ... काय असेल?

"सर डोन्ट वरी अबाउट हॉटेल ओनर. टुडे इज माय लास्ट डे इन धिस हॉटेल. आय गेव्ह माय रेजिग्नेशन टुडे. सो, नो वरीज सर. नाऊ, इफ यू डोन्ट माईंड ..."

जणूकाही माझ्या मनांतल्या शंका ओळखून ती हे बोलली होती.

"येस, ऑफ कोर्स. नो प्रॉब्लेम." मी म्हटलं.

"थँक्यू सर. आय विल कम विदिन फाय मिनिट्स." असं म्हणून ती आत गेली.

पाचच मिनिटात ती तिचा टॉप चेंज करून, तिची पर्स घेऊन आली.

माझ्या समोरची खुर्ची सरकवून घेऊन ती बसली. मी जरा विचारात पडलो होतो.

बसताना हातातली पर्स तिनं बाजूला ठेवली. आणि तिच्या पर्सच्या मागे असलेली माझी फाईल - पुस्तकाची तपासलेली प्रूफं असलेली फाईल मला दिसली!

मला अतिशय आनंद झाला. आज सकाळपासूनचा माझा दिवस ह्या फाईलचा विचार करण्यात इतका बेकार गेला होता! माझ्या चेहऱ्यावरचं आश्चर्य आणि आनंद मी लपवू शकलो नाही.

तिनं ते ओळखलं.

माझी फाईल माझ्याकडं देत ती म्हणाली, "सर, आय बेग अ पार्डन. आय रेड धिस फाईल. आर यू अ रायटर? आर यू गोईंग टू पब्लिश दीज स्टोरीज?"

"**यस**" मी म्हणालो.

पण लगेच माझ्या लक्षात आलं, माझ्या फाईलमधल्या सगळ्या कथा मराठीतून लिहिलेल्या आहेत. हिने ह्या मराठीतून लिहिलेल्या कथा वाचल्या? हिला मराठी वाचता येतं? ती तर इतकं अस्खलित इंग्रजी बोलत होती आतापर्यंत.

न राहवून मी तिला लगेच विचारलं, "डू यू नो मराठी? कॅन यू रीड मराठी?"

"हो सर. मी मराठीच आहे. माझं नाव आभा." तिने प्रथमच शुद्ध मराठीत उत्तर दिलं.

"सर, तुम्हाला एक विचारायचं होतं... तुम्ही ह्या सगळ्या मुलींच्या कथा लिहिल्या आहेत, त्या सत्यकथा, म्हणजे त्यांच्या बाबतीत घडलेल्या खऱ्याखऱ्या कथा आहेत?"

"हो. पण इथे लिहिताना मी त्या मुलींची आणि त्यांच्या गावांची नावं मात्र बदलली आहेत. मी त्यांचं नाव बदलून लिहीन असं त्यांना प्रॉमिस केलं होतं. प्रत्येकीची कथा, व्यथा, कहाणी... म्हटलं तर वेगळी, म्हटलं तर एकाच अंगाने जाणारी. शोषितांची कहाणी ... " मी म्हटलं.

“पण सर, रागावणार नसाल तर एक विचारू? तुम्हाला हे पुस्तक - या मुलींच्या कहाण्या, का पब्लिश करायचं आहे?” तिने निरागसपणे विचारलं.

“या सगळ्याच मुली बिचाऱ्या शोषित, पीडित. त्यांची दुःख, त्यांचं भोगणं आणि त्यावर त्यांनी केलेली मात! त्यांचा जीवनसंघर्ष...”

माझं वाक्य अर्धवट तोडत ती म्हणाली, “हो सर. तुम्ही त्यांच्यासाठीच तर काम केलंय, करताय. तुमच्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत तुम्ही लिहिलंय तसं. “ह्या शोषित, पीडीत मुलींनी जे भोगलं ते ऐकताना, त्यांचं कौन्सिलिंग करताना, मी या कामात अगदी इनव्हॉल्व झालो होतो. त्यामागे कुठेतरी एक गिल्ट - एक सल माझ्या मनांत होता. पुरुषी वर्चस्वाचा. पुरुषी अत्याचाराचा. पुरुषाने अत्याचार करायचा आणि स्वत: नामानिराळं रहायचं. आणि स्त्रियांनी हे सोसत रहायचं. हे सारं बदलायला हवं. समाजमन बदलायला हवं. ह्या जाणीवेतून मी ह्या एन.जी.ओ.मध्ये काम करायचं ठरवलं.”

“मी वाचलं ना सर तुमच्या ह्या फाईलमधे. पण तरी मला कळत नाहीये, की आता हे सारं लोकांसमोर मांडून काय साधणार आहे? आता त्या साऱ्याजणी आपले भोग भोगून त्यातून बाहेर पडल्या आहेत. भूतकाळाला मागे सारून वर्तमानात जगतायत. भविष्यकाळाला कवेत घेऊ पहातायत. तुमचं पुस्तक आल्यावर त्यांच्या मनांत ही जाणीव कदाचित परतपरत येत राहील की आपला ‘काल’ हा असा होता... कदाचित ते आठवून त्यांच्या दु:खावरची खपली पुन्हा निघेल. तिथली जखम भळाळत राहील. मग हे कशासाठी? तुम्ही ह्या मुलींचा ‘भविष्यकाळ’ घडवला हा अभिमान तुम्हाला जगाला दाखवून द्यायचा आहे का? त्यातून प्रसिद्धी मिळवायची आहे का?”

ती फारच धिटाईनं बोलत होती.

मला मनांतून ते अजिबात आवडलं नव्हतं.

इतक्यात एका वेटरनं तिच्या पुढ्यात कॉफी आणि सॅन्डविच आणून ठेवलं. तिनं स्वत:साठी ते आधीच ऑर्डर केलेलं असावं.

मला आठवलं, मगाशी ती म्हणाली होती, इथला जॉब तिने सोडलाय. म्हणजे तीसुद्धा आता ‘कस्टमर’ होती.

ती पुढं म्हणाली, “सर, तुम्ही माझी पण कथा लिहा ना. माझ्या खऱ्या नावासकट लिहिलीत आणि छापलीत तरी चालेल मला. पण तुम्ही हे का लिहिलंय ते सांगाल का प्लीज?”

आता मात्र ह्या मुलीच्या प्रश्नांनी मी खरंच कावलो.

हिला काय करायच्या आहेत नसत्या उचापत्या?

पण असं वाटूनही मी काही तिला फटकन तोडू शकलो नाही.

मी जरा चिडूनच मोठ्या आवाजात तिला सांगितलं, “इथे - इथे माझ्या डोक्यात या साऱ्याजणींच्या कहाण्या घुमत होत्या. अस्वस्थ झालो होतो मी. मग मित्रानं सुचवलं, ‘तू हे लिहून काढ. तुझ्या डोक्यातलं कागदावर उतरलं की तुझं डोकं रिकामं होईल. शांत होशील. वाटल्यास यापुढे हे सोशल वर्क करू नकोस. एकदा रितं होऊन बघ. म्हणून लिहिलं मी हे सारं. जिची तिची कथा आणि व्यथा! हे लिहून काढल्यावर माझं डोकं शांत झालं. मला ह्या साऱ्याचा त्रास व्हायला लागला होता. प्रसिद्धीसाठी नाही, पण हे लिहून काढल्यानंतर माझ्या मनांत जो सल कायम सलत होता, एक गिल्ट वाटत होता तो गेला. माझं अस्वस्थपण गेलं.”

मी का तिला हे सारं सांगितलं? माहीत नाही.

बोलताना माझा आवाज बराच चढला होता.

ती मात्र शांतपणे तिचं सॅन्डविच खात, मध्येच कॉफीचा एकएक घोट घेत लक्षपूर्वक सारं ऐकत होती.

(क्रमशः)

**लीना माटे**

मो. 9819534428

304, अथर्व, माधव गडकरी चौक,

विलेपार्ले पूर्व, मुंबई 400 057